**राज्यातील प्रमुख पिकांवरील कीड व रोगांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला योजनेच्या (क्रॉपसॅप) अंमलबजावणीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः किरोनी-१४१८/ प्र.क्र.५५/४अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १९ मे, २०१८.

वाचा :-

१. शासन पत्र क्र. राफअ- २०१५/ प्र.क्र.३२९/ ९ अे, दिनांक ०६/०१/२०१६ व समक्रमांक दिनांक १६/०८/२०१६
२. संचालक, फलोत्पादन यांचे पत्र जा.क्र./ कृआ/ फलो-३/ हॉर्टसॅप २०१७-१८/ प्रस्ताव/ २८४३/ २०१७, दि. २२/११/२०१७
३. शासन पत्र क्र. पत्र क्र. राकृवि-२०१७/प्र.क्र.१७६/९-अे, दि.०२/१२/२०१७
४. मा. अ.मु.स, कृषि यांची दि.२३/१/२०१८ व २९/१/२०१८ ची ईमेल पत्रे, याबाबत त्यांच्या दालनातील दि.२३/१/२०१८ रोजीच्या बैठकीतील सुचना व त्यानुषंगाने संचालक,विस्तार व प्रशिक्षण यांचे पत्र जा.क्र./विप्र- ७/क्रॉपसॅप १७-१८/प्र.क्र.४/७३/१८, दि.३०/१/२०१८
५. क्रॉपसॅप व हॉर्टसॅप प्रकल्पांची एकत्रीत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यपद्धती निश्चित करणेबाबत दि.७/३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे पत्र जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१४/२७१/१८, दि.२०/०३/२०१८
६. संचालक, कृषि प्रक्रीया व नियोजन यांची टिपणी जा. क्र./ नियोजन/ वायो १८१९/ अंमलबजावणी/ १७९/२०१८, दि.२८/०३/२०१८.
७. क्रॉपसॅप प्रकल्पाच्या राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि.११/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय
८. संचालक, फलोत्पादन यांचे पत्र क्र./कृआ/फलो-३/हॉर्टसॅप२०१८-१९/अंमलबजावणी/ १४९२/१८, दि.२७/०४/२०१८
९. आयुक्त (कृषी) यांचे पत्र जा. क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १७-१८/प्र.क्र.२ / ४०९/१८, दि.०९/०५/२०१८

**प्रस्तावना:**

सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा या प्रमुख पिकांवरील कीड व रोगांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने सन २००९-१० ते २०१२-१३ दरम्यान राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून आणि सन २०१३-१४ पासून नियमित राज्य योजनेतून कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) राबविण्यात येत आहे. सदर योजनेची उपयुक्तता लक्षात घेऊन क्रॉपसॅप योजनेच्या धर्तीवर आंबा, डाळींब, केळी, मोसंबी, संत्रा व चिक्कू या प्रमुख फळ पिकांसाठी सन २०११-१२ पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेतू हॉर्टसॅप प्रकल्प राबविण्यात येत आहे.

क्रॉपसॅप व हॉर्टसॅप प्रकल्पांची एकसमान कार्यपद्धती विचारात घेऊन दोन स्वतंत्र योजना न राबविता फळ पिकांचा क्रॉपसॅप योजनेमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने निर्देशित केले होते. याबाबत दि.७/३/२०१८ रोजीच्या बैठकीत आणि क्रॉपसॅप योजनेच्या राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दि. ११/०४/२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा होऊन राज्यातील प्रमुख फळ पिके व इतर पिकांवरील कीड रोगांच्या व्यवस्थापनाचे दृष्टीने एकत्रीत क्रॉपसॅप योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला व सदर सुधारित क्रॉपसॅप योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच सदर प्रकल्पांतर्गत पिकांवरील किड व रोगाचे विविध टप्प्यावर काटेकोरपणे व नियमितरित्या परिक्षण करुन त्यासंदर्भात तज्ञांकडून मार्गदर्शन व सल्ला प्राप्त करुन शेतकऱ्यांना कालमर्यादेत मार्गदर्शन करण्यासंदर्भात सुधारित सूचना निर्गमित करण्याचे प्रस्तावित होते. याअनुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

१. सन २०१८-१९ पासून सोयाबीन, कापूस, भात, तूर, हरभरा, आंबा, डाळींब, केळी, मोसंबी, संत्रा व चिक्कू या प्रमुख पिकांवरील कीड व रोगांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने एकत्रित कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला योजना (क्रॉपसॅप) योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सन २०१८-१९ मध्ये या योजनेंतर्गत ₹४१४७.०८ लक्ष (अक्षरी रुपये एकेचाळीस कोटी सत्तेचाळीस लक्ष आठ हजार फक्त) निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला योजनेची सन २०१८ मध्ये अंमलबजावणी करण्याकरिता खालील मार्गदर्शक सूचना विहित करण्यात येत आहेत -:

   १) क्रॉपसॅप योजनेमध्ये सोयाबीन, कापूस, भात, तूर, हरभरा या प्रमुख पिकांसह आंबा, डाळींब, केळी, मोसंबी, संत्रा व चिक्कू या प्रमुख फळ पिकांचा समावेश राहील.

   २) सोयाबीन, कापूस, भात, तूर व हरभरा या पिकांसाठी क्रॉपसॅप योजनेची अंमलबजावणी कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सहभागाने करण्यात यावी व त्याकरिता राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांनी विकसीत केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशन व संगणक प्रणालीचा वापर करण्यात यावा.

   ३) सदर योजनेकरिता विकसित करण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षक यांची स्काऊट म्हणून व मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांची त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रासाठी पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून नोंदणी करण्यात यावी व त्यांना यादृच्छिक पध्दतीने (Random) कीड व रोग सर्वेक्षणाची जबाबदारी देण्यात यावी.

४) कीड व रोग सर्वेक्षणाची माहिती मोबाईलद्वारे ऑनलाईन संकेतस्थळावर माहिती भरण्यास येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आवश्यकतेनुसार राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांच्यामार्फत संगणक ऑपरेटर व इतर अत्यावश्यक मनुष्यबळ खरीप हंगामाच्या सुरुवातीच्या कालावधीकरिता आयुक्त (कृषि) यांनी उपलब्ध करुन घ्यावे. तसेच त्यांच्या मदतीने कृषि खात्यातील कर्मचाऱ्यांना माहिती भरण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे.

५) संचालक (फलोत्पादन) यांनी पुढील ६ महिन्यांमध्ये सुधारित क्रॉपसॅप योजनेंतर्गत फळ पिकांसाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या मदतीने मोबाईल ॲप्लिकेशन व संगणक प्रणाली विकसीत करुन घ्यावी आणि सदर प्रणाली विकसीत हाईपर्यंत राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र, नवी दिल्ली यांनी हॉर्टसॅप प्रकल्पाकरिता विकसीत केलेल्या संगणक प्रणालीचा सर्वेक्षण व अहवाल नोंदणीसाठी उपयोग करावा.

६) सदर योजनेतील समाविष्ट पिकांसाठी कीड व रोग सर्वेक्षणाची अचूक माहिती भरणे व त्याचे व्यवस्थापन ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीद्वारे करण्यासाठी कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षक यांना तसेच सदर प्रणालीमध्ये नोंदणी करण्यात आलेल्या पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांना खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी संगणकीय प्रणालीबाबतचे परिपूर्ण प्रशिक्षण देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

७) योजनेच्या नियोजन व संनियंत्रणासाठी राज्य पातळीवर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली (कृषि) राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत असून तिची रचना **<u>परिशिष्ट - अ</u>** मध्ये नमूद केली आहे.

८) क्रॉपसॅप योजनेंतर्गत पिकांवरील प्रमुख कीड व रोगांचे सर्वेक्षण करुन त्यांच्या व्यवस्थापनाबाबत मोबाईल ॲपद्वारे व एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना सल्ले देण्यात यावेत.

९) सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांचा देखील सहभाग राहावा यादृष्टीने शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील कीड व रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे छायाचित्र अथवा त्यांची माहिती संगणकीय प्रणालीद्वारे वा मोबाईल ॲप वरुन कृषि विभागास सादर करण्याची सुविधा (अपलोड) उपलब्ध करून द्यावी. सदर प्रयोजनार्थ सर्व प्रथम संबंधित शेतकऱ्यांच्या मोबाईल क्रमांकावरुन पिकावरील किड व रोगाच्या प्रादुर्भावाबाबत सल्ला प्राप्त करण्यासाठी विनंती प्राप्त झाल्यानंतर ओटीपी (One Time Password) द्वारे शेतकऱ्याची ओळख निश्चित केल्यानंतर शेतकऱ्याकडून पिकाच्या प्रादुर्भावासंदर्भातील माहिती स्विकारुन त्याबाबत तज्ञांकडून सल्ला व मार्गदर्शन प्रणालीद्वारे प्राप्त करण्यासाठीची अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात यावी. याकरिता प्रस्तावित संगणकीय प्रणालीमध्ये आवश्यक ती तजवीज करण्याची खातरजमा करावी.

१०) संबंधित पिकाच्या विकासाच्या विविध महत्वपूर्ण (Critical) टप्प्यावर कीड व रोगाचे प्रमाण आर्थिक नुकसान पातळीवर पोहोचण्यापूर्वी अथवा आर्थिक नुकसान पातळीजवळ (पिवळ्या टप्प्यावर असताना) सुरुवातीपासूनच संबंधित नेमून दिलेल्या गावातील पिकांचे नमुने घेऊन त्याची तपासणी व सर्वेक्षण काटेकोरपणे नियमित स्वरुपात प्रणालीद्वारे तज्ञांकडून मार्गदर्शन व सल्ला प्राप्त करुन त्यासंदर्भात तात्काळ संबंधित पीक क्षेत्राच्या गाव व तालुका स्तरावर शेतकऱ्यांना आवश्यक सल्ला मोबाईल एसएमएस द्वारे देण्याची व सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र सभा, बैठका व प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्याची जबाबदारी ही कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांची राहील. यानुसार गावपातळीवर कार्यवाही नियमितपणे होत असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी ही मंडळ कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांची असेल. याबाबतचा विभागीय स्तरावर नियमितपणे प्रत्येक पंधरवडयास उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांनी आढावा घेणे बंधनकारक असेल.

११) वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबतचा आढावा हा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांनी घ्यावा. तसेच क्षेत्रीय स्तरावरुन कृषि विद्यापीठांकडे पिकावरील कीड व रोगासंदर्भात मार्गदर्शन व सल्ला घेण्यासाठी प्राप्त होणाऱ्या बाबींची विनाविलंब नोंद घेऊन त्याचा नियमित स्वरुपात दोन दिवसांच्या आत संबंधित तज्ञांचे मार्गदर्शन व सल्ले प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावे. याबाबत देखील विद्यापीठ स्तरावर विविध विभागाच्या विभाग प्रमुखांनी आढावा घेणे आवश्यक असेल.

१२) सदर प्रणालीवर शेतकऱ्यांकडून व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून पिकावरील कीड व रोगाच्या प्रादुर्भावाबाबत उपस्थित केलेल्या तक्रारी/माहिती, त्याअनुषंगाने तज्ञांकडून देण्यात आलेले सल्ले व त्यानुसार तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक यांनी केलेल्या विविध उपाय योजनांचा सविस्तर तपशील सर्व संबंधितांच्या माहितीकरिता खुल्या स्वरुपात प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

१३) तसेच कीड रोगाचे प्रमाण आर्थिक नुकसान पातळीवर (ईटीएल) पोहोचण्यापूर्वीच अथवा आर्थिक नुकसान पातळीजवळ (पिवळ्या टप्प्यावर असताना) असलेल्या आणि आर्थिक नुकसान पातळीवर पोहोचलेल्या गावांची तालुकानिहाय स्वतंत्र अद्ययावत यादी सर्व संबंधितांच्या माहितीकरिता खुल्या स्वरुपात प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

१४) कृषि आयुक्तालयाच्या स्तरावर फळ पिकांच्या योजना संचालक (फलोत्पादन) पर्यवेक्षण करतील व अन्य प्रमुख पिकांच्या योजना संचालक (विस्तार व प्रशिक्षण) हे पर्यवेक्षण करतील. संबंधित संचालक यांनी त्यांनी त्यांच्या संनियंत्रणाखालील प्रचलित योजनांची सांगड घालून

कीड रोग नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने नियमित पाठपुरावा करावा व सनियंत्रण करावे. तसेच संपूर्ण हंगाम कालावधीत दोन्ही संचालकांनी संबंधित पिकाबाबत क्षेत्रीय स्तरावरील कीड व रोग प्रादुर्भावाच्या परिस्थितीचा प्रत्येक आठवडयास आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

१५) योजनेच्या मोबाईल ॲपद्वारे कीड व रोगांची निरीक्षणे स्वतःच्या मोबाईलवरून ऑनलाईन भरण्यासाठी तसेच, कीड - रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मोबाईल इंटरनेट व अन्य आकस्मिक बाबींवर होणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी ज्या कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षकांना कीड व रोग सर्वेक्षकाचे काम निश्चित करुन देण्यात आलेले आहे, त्यांना प्रोत्साहनपर पीक सर्वेक्षण कालावधीमध्ये रु.५००/- प्रती महिना खर्च देण्यात यावा.

३. **शेंदरी बोंड अळी व्यवस्थापन:** सन २०१७ च्या खरीप हंगामात कापूस पिकावर शेंदरी बोंड अळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला होता. सन २०१८ मध्ये त्याची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने क्रॉपसॅप योजनेच्या राज्य स्तरीय सुकाणू समितीच्या दि २०१८/०४/११.रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शेंदरी बोंड अळीचे व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने वरील परिच्छेद २ येथे नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही करावी. याकरिता वरील परिच्छेद १ येथे नमूद केलेल्या कृती आराखडयाच्या निधीतून खालील बाबींकरिता निधी उपलब्ध करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आहे -

अ. **शेतकरी प्रशिक्षण:** कापूस उत्पादक जिल्हयांतील ५४५ मंडळातील जे कापूस उत्पादक शेतकरी व आत्मा अंतर्गत शेतकरी मित्र शेंदरी बोंड अळी व्यवस्थापनाकरिता स्वखर्चाने फेरोमेन सापळा लावून शासनास कीड व रोग प्रादुर्भावाबाबत माहिती सादर करणार असतील त्यांचेकरिता एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात यावे. सदर शेतकऱ्यांची संगणकीय प्रणालीवर ओटीपीद्वारे नोंदणी करुन घेण्यात यावी. अशाप्रकारे प्रति मंडळ १०० शेतकऱ्यांची निवड करण्यात यावी. सदर प्रशिक्षण वर्गात शेतकऱ्यांना कृषि विभागातील प्रविण प्रशिक्षक अधिकारी, कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ यांचेद्वारे प्रशिक्षीत करण्यात यावे.

आ. **सर्वेक्षण:** नियमित क्रॉपसॅप योजनेंतर्गत कृषि विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी/कर्मचाऱ्यांद्वारे कापूस पिकावरील शेंदरी बोंड अळीसह इतर पिकांकरिता फेरोमेन सापळ्यांद्वारे सर्वेक्षणाचे कार्य करावयाचे आहे. तसेच सदर प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांना नेमून दिलेल्या गावातील पिकाचे विविध महत्वपूर्ण (Critical) टप्प्यावर सर्वेक्षण व तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र कषि उद्योग विकास महामंडळामार्फत फेरोमेन सापळयाची व ल्यूर्सची तालुका कृषि अधिकारी यांनी संक्षिप्त देयकाच्या माध्यमातून खरेदी करावी. त्याकरिता प्रत्येक कृषि सहाय्यक व

पर्यवेक्षकास नेमून दिलेल्या पीक क्षेत्राकरिता आवश्यक असलेल्या फेरोमेन सापळयांची संख्या विचारात घेऊन तालुक्याकरिता आवश्यक एकूण फेरोमन सापळयांची संख्या महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळास कळविण्यात यावी व महामंडळाने त्यानुसार त्यांच्या वितरकाकडे फेरोमेन सापळयांची पुरेशी उपलब्धता करुन दयावी. अशा प्रकारे खरेदी केलेल्या फेरोमेन सापळयाची सविस्तर नोंद ही भांडार नोंदवहीत घेऊन याचा तात्काळ वापर हा संबंधितांना नेमून दिलेल्या पिक क्षेत्रावर होणाऱ्या संभाव्य किड व रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करावा.

कापूस पिकाच्या सरासरी पेरणी क्षेत्राच्या किमान १०% क्षेत्रावरील पिकाचे गावातील प्रगतीशील शेतकरी / आत्मा अंतर्गत शेतकरी मित्र यांनी स्वखर्चाने फेरोमेन सापळ्यांद्वारे सर्वेक्षण करुन संगणकीय प्रणालीवर कीड व रोग प्रादुर्भावाबाबतची माहिती सादर करण्यास प्रोत्साहित करावे. त्यासाठी त्यांना फेरोमेन सापळ्यांची स्थानिक पातळीवर उपलब्धता होण्यासाठी योग्य सहाय्य करण्यात यावे. सदर क्षेत्रामधील शेंदरी बोंड अळीचे शेतकरी स्वत: सर्वेक्षण करुन प्रणालीवर माहिती सादर करतील व किडीच्या प्रादुर्भावानुसार तज्ञांच्या सल्ल्यानुसार आवश्यक उपाययोजना करतील.

इ. **शेंदरी बोंड अळी एकात्मिक व्यवस्थापन पद्धती अंतर्गत पतंग पकडून नष्ट करणे** (Mass trapping): कापूस उत्पादक २० जिल्ह्यामध्ये प्रती तालुका एक गाव याप्रमाणे एकूण २०४ गावांत प्रती गाव कमाल १०० हेक्टर कापूस क्षेत्रावर १००% अनुदानावर शेंदरी बोंड अळी एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीअंतर्गत मोठया प्रमाणावर पतंग पकडून (Mass Trapping) नष्ट करण्यात यावेत, जेणेकरुन किडीचे पुढील जीवनचक्र खंडीत होण्यास मदत होईल. याचे नियोजन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी करुन त्याची कृषि सहायक व कृषि पर्यवेक्षक यांचेकडून अंमलबजावणी करुन घ्यावयाची आहे. सदर प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी २० फेरोमेन सापळे लावावेत तसेच ट्रायकोग्रामा बॅक्ट्री या परोपजीवी किटकांची प्रति हेक्टरी १.५० लाख अंडी या प्रमाणे दोन वेळा प्रसारण करण्यात यावे. प्रती ट्रायकोकार्ड २० हजार अंडी या प्रमाणे प्रति हेक्टरी एकूण १५ ट्रायकोकार्ड शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावेत.

ई. **आपत्कालीन निविष्ठा:** शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढल्यास आर्थिक नुकसान पातळीच्या वरील गावांत तात्काळ उपाययोजना करुन शेतकऱ्यांना जैविक / रासायनिक किटकनाशक निविष्ठांसाठी रु.७५०/- प्रती हेक्टर किंवा ५० टक्के अनुदानावर २ हेक्टर क्षेत्र मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन दयावे. तसेच याव्यतिरिक्त आवश्यक असल्यास आयुक्त (कृषि) यांनी शासनास वेळोवेळी स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करावा. सदर आपत्कालीन निविष्ठांचा वापर कापूस पिकासह सोयाबीन, भात, तूर व हरभरा पिकांवरील कीड रोगांच्या व्यवस्थापनासाठी करण्यात यावा. सदर किटकनाशक निविष्ठा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची उप कंपनी महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड लिमिटेड (MIL) यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील. कापूस पिकाच्या सरासरी पेरणी क्षेत्राच्या २.५०% (१

लाख हेक्टर) व इतर पिकांचे ७,००० हेक्टर असे एकूण १.०७ लाख हेक्टर क्षेत्राकरीता किटकनाशक निविष्ठांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीचा विनियोग करण्यात यावा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांनी केंद्रीय कीटकनाशक मंडळाने शिफारस केलेल्या किटकनाशकांची तालुका निहाय मागणी नोंदवावी व महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने सदर किटकनाशकांची तालुकास्तरावर उपलब्धता करुन द्यावी अथवा जिल्ह्याच्या क्षेत्र मर्यादेत शेतकऱ्यांनी स्वत: खरेदी केलेल्या औषधांसाठी थेट लाभ हस्तांतरण योजनेच्या (DBT) माध्यमातून त्यांना अनुदान देण्यात यावे.

**उ.** महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेकडून फेरोमेन सापळे आणि कृषि विद्यापिठे, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभागाच्या जैविक किटकनाशके उत्पादन प्रयोगशाळा यांच्याकडून पुरवठा केलेल्या ट्रायकोग्रामा बॅक्ट्री परोपजीवी किटकांचा प्रकल्पांतर्गत सर्वेक्षण व प्रात्यक्षिकांसाठी वापर होणार आहे. या बाबींकरीता शेतकऱ्यांना अनुदान देय नसल्याने यासाठीचा संपूर्ण निधी संबंधीत संस्थेस अदा करण्यात यावा. प्रथमत: महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांना फेरोमेन सापळे व ल्यूर्ससाठीची मागणी कृषि आयुक्तालयाकडून एकत्रितपणे नोंदविण्यात यावी. तथापि महामंडळाकडे नोंदणी केलेल्या मागणीनुसार पुरवठा झाल्यानंतर त्याचा योग्य तो विनियोग करण्याची खातरजमा आयुक्त (कृषि) यांनी करावी.

४. सदरच्या सुधारित क्रॉपसॅप योजनेसंदर्भात वर नमूद केलेल्या बाबी तसेच आयुक्त (कृषी) यांनी वरील संदर्भ क्र. ९ येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत असून याबाबत सविस्तर आवश्यक मार्गदर्शक सूचना आयुक्तालय स्तरावरुन सर्व संबंधितांकरिता विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात .सदरच्या योजनेची सुधारित संगणकीय प्रणाली तात्काळ कार्यान्वित करावी . सदर योजना शेतकऱ्यांचे कमी खर्चात जास्तीत जास्त पीक उत्पादन वाढवून त्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वपूर्ण असल्याने विशेष मोहीम स्वरुपात अंमलबजावणी होईल याची खातरजमा आयुक्त (कृषी) यांनी करावी. याकरिता आवश्यकतेनुरुप योजनेचा प्रचार व प्रसिध्दी देण्याची देखील कार्यवाही करावी .

५. सदर योजनेंतर्गत कृषि विभागाव्यतिरिक्त अन्य सहभागी संस्थांसाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (बी.डी.एस.) निधी वितरणाची तरतुद उपलब्ध नसल्याने त्यांच्यासाठी तरतूद केलेला निधी कृषि आयुक्तालय स्तरावर आहरीत करुन त्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएसद्वारे निधी वर्ग करणे तसेच, क्रॉपसॅप योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये सदर सहभागी संस्थांना वितरीत केलेल्या निधीपैकी त्यांच्या स्तरावर अखर्चित असलेला निधी सन २०१८-१९ मध्ये खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सन २०१८-१९ मध्ये क्रॉपसॅप योजनेची अमंलबजावणी करण्याकरिता पहिल्या टप्पयात रु १०.५०. कोटी (रुपये दहा कोटी पन्नास लाख फक्त ) इतका निधी वितरीत करण्यात येत असून योजनेच्या

पुढील लेखाशीर्षांखाली सन २०१८-१९ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा:-

मागणी क्र. डी-३
२४०१, पीक संवर्धन,
१०२-अन्नधान्य पीके,
(००) (३०) पिकावरील किड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
(२४०१ ९२४२) राज्य योजना
३३-अर्थसहाय्य

७. सदर योजनेंतर्गत मंजूर निधी आयुक्तालय स्तरावर कोषागारातून आहरीत करुन योजनेंतर्गत सहभागी संस्थांना वितरीत करण्यास तसेच, आयुक्तालय स्तरावरील खर्चासाठी सहाय्यक संचालक, लेखा-१, यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून आणि आयुक्त (कृषि) यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, आयुक्त (कृषि) यांनी सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचे आवश्यकतेनुसार जिल्हा निहाय वितरण करावे.

८. सदर योजनेंतर्गत वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (कृषि) यांनी शासनास सादर करावे.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि ०२.०४.२०१८.नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे .

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२११२३५४०१६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.05.21 12:36:52 +05'30'

**( श्रीकांत आंडगे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१२) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१३) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
१४) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१९) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२०) निवड नस्ती ४-अे.

## परिशिष्ट-अ

## क्रॉपसॅप प्रकल्प संयुक्त सुकाणू समिती

| अ. क्र. | सहभागी संस्था | प्रतिनिधी | पद |
|---|---|---|---|
| १ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र, नवी दिल्ली (एनसीआयपीएम), नवी दिल्ली | संचालक | सहअध्यक्ष |
| ३ | वनस्पती संरक्षण, संगरोध व संग्रह संचालनालय, भारत सरकार, फरीदाबाद, हरयाना | भारताचे पीक संरक्षण सल्लागार, भारत सरकार | सदस्य |
| ४ | महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादीत | व्यवस्थापकीय संचालक | सदस्य |
| ५ | महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग | उप सचिव | सदस्य |
| ६ | कापूस विकास संचालनालय, नागपूर | संचालक | सदस्य |
| ७ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि संचालक, विस्तार व प्रशिक्षण | सदस्य |
| ८ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण | सदस्य |
| ९ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | संचालक, फलोत्पादन | सदस्य |
| १० | केंद्रीय कापूस संशोधन केंद्र, नागपूर | संचालक | सदस्य |
| ११ | राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद | संचालक | सदस्य |
| १२ | राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर | संचालक | सदस्य |
| १३ | राष्ट्रीय लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर | संचालक | सदस्य |
| १४ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापीठ, परभणी | विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग व वनस्पती रोगशास्त्र विभाग | सदस्य |
| १५ | महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहूरी | विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग व वनस्पती रोगशास्त्र विभाग | सदस्य |
| १६ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग व वनस्पती रोगशास्त्र विभाग | सदस्य |
| १७ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग व वनस्पती रोगशास्त्र विभाग | सदस्य |
| १८ | केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था, हैद्राबाद | प्रधान शास्त्रज्ञ, किटकशास्त्र | सदस्य |
| १९ | केळी संशोधन केंद्र, जळगाव | उद्यान विद्यावेत्ता | सदस्य |
| २० | कृषि संशोधन केंद्र, पालघर | कीटकशास्त्रज्ञ | सदस्य |
| २१ | विभागीय संशोधन केंद्र, वेंगुर्ला | प्रमुख शास्त्रज्ञ | सदस्य |
| २२ | राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे | तांत्रीक संचालक तथा वैज्ञानिक “ई” | सदस्य |
| २३ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि सहसंचालक (विस्तार व प्रशिक्षण-१, २ व ३) | सदस्य |
| २४ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि सहसंचालक, फलोत्पादन | सदस्य |

| अ. क्र. | सहभागी संस्था | प्रतिनिधी | पद |
|---|---|---|---|
| २५ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | विभागीय कृषि सहसंचालक- ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर विभाग | सदस्य |
| २६ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि उपसंचालक, संगणक प्रकल्प | सदस्य |
| २७ | राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र, (एनसीआयपीएम), नवी दिल्ली | डॉ. एस. व्हेनीला, प्रधान शास्त्रज्ञ, किटकशास्त्र | तांत्रीक समन्वयक |
| २८ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि उपसंचालक, फलोत्पादन ३ | सदस्य सहसचिव |
| २९ | कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य | कृषि उपसंचालक, पीक संरक्षण | सदस्य सचिव |